# डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर


**डॉ. ममता इंगोले**

**(प्रमुख, मराठी विभाग)**


---

## शीर्षक

## प्रश्नोत्तरे अशी लिहावीत.....

## बी.ए. प्रथम वर्ष (मराठी)

प्र.1) "जीवन आणि शिक्षण ह्या एकाच नावाच्या दोन बाजु व्हाव्यात" हे आचार्य विनोबा भावे यांचे मत त्यांच्या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

उत्तर :- 1) निसर्ग विरुध्द तथा जिवनाविरोधी शिक्षण :
विनोबाजींच्या मते आजचे शिक्षण हे चमत्कारीक आहे. ते जीवनविरोधी आहे कारण त्यामुळे जिवनात तुकडे पडतात. आयुष्याच्या पहिल्या पंचवीस वर्षात जीवनाला पाठ दाखवुन केवळ पुस्तकी शिक्षण घ्यावे लागते आणि नंतरच्या पुर्ण आयुष्यात सारे शिक्षण गुंडाळुन ठेवुन जीवन जगावे लागते. अशी ही जीवनाची फारकत करणारी शिक्षण पध्दती निसर्गविरोधी आहे: कृत्रिम आहे; निसर्गात प्रत्येक गोष्टीची वाढ क्रमाक्रमाने पण नकळत होत असते. ही निसर्ग योजना आजच्या शिक्षण पध्दतीत नाही. जगताजगता जीवनातुन जीवनापासुन शिक्षण मिळाले अशी योजना आजच्या शिक्षणात नाही. शिक्षण सुरु असे पर्यंत जीवनाकडे पाठ फिरवावी व शिक्षण संपले की जीवनात उडी मारावी. जीवनाची जबाबदार-पणात गारलेली ही हनुमान उडी आहे. त्यास हातपाय तुटले म्हणजे नवल नाही.

2) गीतेचा जन्म कुरुक्षेत्रात :
भगवंतांनी अर्जुनाला गिता सांगितली ती कुरुक्षेत्रात त्यांनी गीतेचे अगाऊ वर्ग विकत घेतले नाही. ती कुरुक्षेत्रात- जीवनशास्त्रात सांगितली म्हणून ती पावली. तसेच प्रकार शिक्षणाच्या बाबतीत असावयास पाहीजे. शिक्षणाचे पाठ जिवनाच्या कुरुक्षेत्रात मिळाले पाहीजे, शिक्षण म्हणजे जीवनाची पुर्वतयारी असे म्हटले जाते.

पण आम्ही जे पुर्वतयारीचे ज्ञान जिवनापासुन अलिप्त ठेवतो. चार खोलीच्या बंदिस्त जगात विशाल जिवनाचे ज्ञान कसे मिळणार ?

आजचा शिक्षण घेणारा विद्यार्थी जिवनात नाना प्रकारच्या आशा बाळगतो. भव्य स्वप्न पाहतो. कुणाला वाल्मिकीसारखे कवी व्हावेसे वाटते, तर कुणाला न्युटनसारखे शास्त्रज्ञ व्हावेसे वाटते. अशी स्वप्न पाहण्याची भाग्यही फारच थोड्यांना लाभते. पण ही स्वप्ने खरी होतात का?

शिक्षणाच्या कृत्रिम जगातुन विद्यार्थी जेव्हा प्रत्यक्ष जगात शिरून जातो, शिवाजी बनण्याचं स्वप्न पाहणारा पोटासाठी वणवण भटकणारा शिवाजी होतो. "वाल्मिकी बनु इच्छिणारे दुःखाचे रडगाणे गाणारा वाल्मिकी होतो. न्युटन बनणारा एखाद्या कार्यालयात कारकुन होतो. सर्वजण पोटासाठी राबु लागतात, असे हे आजचे शिक्षण आहे.

3) जीवनाची जबाबदारी : आजचे शिक्षण जिवणाची जबाबदारी ओळखण्यात शिकवित नाही. ~~शिक्ष~~ जिवनाची जबाबदारी म्हणजे संकट नव्हे मरणेही नव्हे अनुभव नसल्यामुळे ते मरण्यासारखे संकट आले. वास्तविक जीवन आणि मरण ह्या दोन्ही आनंदाच्या वस्तु समजल्या पाहीजे कारण त्या परमेश्वराने दिलेल्या आहेत. ईश्वराने हे जीवन दुःख पुर्ण निर्मिले नाही. आजचे मरण उद्यावर ढकला-ढकलता एक दिवस असा उगवतो की ज्या दिवशी मरावेच लागते. हा प्रसंग ज्याच्यावर येत नाही, जे मरण्या-आधीच मरून जातात. जे आपले मरण डोळ्यांनी पाहतात जे मरणाचा आगाउ ~~डोळ्यांनी~~ ~~साक्षात~~ अनुभव घेतात.

त्यांचे मरण टळते. ते मरणाचा आगाऊ अनुभव द्यायला कचरतात. धजत नाहीत. त्यांच्या उरावर मरण आदळते. त्या खांबातील घ्यातील प्रत्यक्ष धक्का लागल्यानंतर समजते. डोळ्याला तो खांब आगाऊ दिसतो, म्हणून त्याचा धक्का त्याच्या छातीवर लागत नाही.

जिवनाची जबाबदारी म्हणजे काही अगदी मरण नाही. आणि मरण तरी काय एवढे मोठे मरण आहे. अनुभवाच्या अभावी सारा बाऊ वाटतो. वास्तविक जिवन आणि मरण दोन्ही आनंदाच्या वस्तु असल्या पाहिजे. कारण आपल्या मुलाचे जिवन वळवळीचे असावे अशी इच्छा करीत? कल्पना कशाला? प्रत्यक्षच पहाणा. जी वस्तु आपल्याला जितकी जरूरीची ती तितकी सुलभतेने मिळावी अशी ईश्वराने योजना केली आहे. पाण्यापेक्षा हवेची जरूर जास्त. तर ती प्रत्येकाला कायमची देऊनच टाकली आहे. अशी ईश्वराची प्रेमळ योजना आहे. तिचा प्रचार न करता आम्ही निरुपयोगी जडजवाहीर जमा करण्याइतकी 'जड' बनलो. तर आम्हाला उशी फुटावे लागेल. पण हा आमच्या जडतेचा दोष आहे. त्याचा बोल ईश्वराला नाही. जीवनाची निर्मिलेली जीवनाची ही सरळ योजना लक्षात घेऊन बत्थभलत्या वासनांना आळा घालू शकतो. पण जशी ही आनंदाने भरलेली वस्तु आहे. तशी ती शिक्षणाने भरलेली आहे. जो जीवनाच्या जबाबदारीचे भान जर मुलाला राहीले तर त्याचे जीवन कोमेजून जाईल. पण जीवनाच्या जबाबदारीचे भान असल्याने जर जीवन करपून जात असेल तर जीवनही

वस्तु जमव्याच्या लायकीची नाही असे म्हणावे लागेल. पण आज ही समजुत पुष्कळ शिक्षणशास्त्राचीही आहे. याचे त्यांचे मुळ कारण जीवना - विषयची दुष्ट कल्पना. जीवन म्हणजे 'कलह आहे' असा आग्रह झाला. इसापनीतितल्या आरसिक मानलेल्या पण वास्तविक मर्म जाणणाऱ्या कोंबड्या पासुन बोध घेउन जोधकाच्या दाण्यापेक्षा मोत्याला मान देण्याचे सोडुन दिले तर जीवनातला कलह नाहीसा होउन जीवनात सहकार दाखल होईल. 'माकडाच्या हाती मोत्यांची माळ' ही गोष्ट ज्यांनी निर्माण केली, त्यांनी मनुष्याच्या पुर्वजाविषयीचे डार्विनचे तत्व सिद्ध केले. मारुतीच्या हाती मोत्यांची माळ ही गोष्ट ज्यांनी रचली ते आपल्या मनुष्य तत्वाला जागले. जीवनभर भयानक वस्तु कलह असेल तर मुलांना त्यात दाखल करु नका आणि स्वत:ही ते जमु नका, पण जी जर जगण्यालायक वस्तु असेल तर मुलांना त्यात अवश्य दाखल करा. त्याशिवाय त्यांना शिक्षण मिळणार नाही. भगवतगीत जसे कुरुक्षेत्रात तसे शिक्षण जिवनक्षेत्रात दिले पाहीजे. देता येईल, देता येईल हीही भाषा बरोबर नाही तेथेच ते मिळु शकेल. अर्जुनापुढेल प्रत्यक्ष कर्तव्य करीत असा प्रश्न उत्पन्न झाला. त्याचे उत्तर देण्यासाठी भगवतगीता निर्माण झाली. ह्यालाच शिक्षण म्हणतात. मुलाला शेतात काम करु द्या.

प्र.3) ग्रामीण भागातील सामुहिक जीवनाचा आविष्कार 'इर्जिक' या पाठाच्या आधारे लिहा.

उत्तर:- या पाठाचे शिर्षक आहे 'इर्जिक' इर्जिक आडवळणाच्या सध्याच्या आर्थिक व्यवहारात अभावाने येणारा म्हणून वाचकाला प्रश्न पडतो. 'इर्जिक म्हणजे काय? आणि त्याचे उत्तर शोधतांना मूळ पाठ वाचणेच योग्य ठरेल. ग्रामीण जीवनात 'इर्जिक' किती महत्वाचे कार्य करीत असल्याची खात्री वाचकाला भेटत व ही संस्कृती कालानुरूप लोप पावत असल्यानेच आज आपला शेतकरी आत्महत्या ह्या व्यसनात बळी ठरल्या दिसत. '२०७७' साली लोकसत्ता वर्तमानपत्राने लेखकास 'इर्जिक' हा पहिला लेख.

'इर्जिक' म्हणजे जेव्हा शेतकरी आर्थिक-दृष्ट्या घायवत होता, पडीत शेत नांगरणे, पेरणे, वखरणे आदि कुठलेही कृषी कार्य करण्यास तो असमर्थ ठरतो तेव्हा पूर्वी 'इर्जिक' घालत असे म्हणजे संपूर्ण गावासमोर हा प्रस्ताव ठेवण्यात येत असे. मग एक दिवस ठरविला जात असे व संपूर्ण गावच त्या दिवशी त्यांच्या शेतात राबत असे. एक दिवसातच महिन्याभराचे कार्य पूर्ण होत असे आणि त्या बदली तो शेतकरी गुळवणी व लापशी च गोड जेवण त्यांना देत असे. लेखकानी महाविद्यालयातील काळात केलेल्या कवितांची एक जुनी वही चाळली त्यात एक भलुरी होती. त्यातील ओळी अशा होत्या. 'बळीराजा संभाजी, घालतोया इर्जिक
समदे मिळुनी, खाइया गोडीन'.
यातील 'इर्जिक' शब्दाभोवती लेखकाचे मन पुन्हा पुन्हा घुटमळु लागते. आजच्या पिढीत

याचा अर्थ माहीत असणे अशक्य, तर या शब्दाला पर्यायी शब्दही नाही. प्रत्यक्षात इर्जिक म्हणजे समाज व्यवस्थेतील एक अर्थपूर्ण घटना आहे. जेव्हा शेतकरी सर्व बाजूंनी घायाळतो, हलचल होतो, खाण्यास अन्नही नाही दावणीला बैल नाही, जमीन पडीक होते, तो इर्जिक घालतो. गावातील मंडळींना आपली आगतीकता सांगतो व इर्जिक घालतो.
एक दिवस ठरविला जातो सन् भांडी घेवून येतात. आणि सगळे शेतकरी आपले बैल, नांगर, औत घेऊन माणस-पोरे त्याच्या शेतात जातात. एका दिवसात संपूर्ण शेत तयार होते. पुढे पेरणी साठीही इर्जिक पावले जाते. त्या बदल्यात सर्वांना इर्जिक म्हणजे गरीबाघरचे पक्वान्न, तेलाच्या गुळवणी किंवा त्यापूर्वीचे गोड जेवण घालायचे असत. त्यासाठीही गावच्या सुगरणी घरची पोळपाट, लाटणी अन् भांडी घेवून येतात. बरे हे करताना कुठलीही उपकाराची भावना कोणी ठेवत नाही. एखादा उत्सव साजरा करण्याच्या उत्साहात ते सर्व कामे करतात. व मग जेवणावर ताव मारतात. आणी व गप्पा चालतात अडचणीतल्या शेतकऱ्याचे उत्साहात ते सर्व कामे करतात. आपली आपत्ती काळात आपण एकटे नाही तर संपूर्ण गाव आपल्या साथीला आहे, ही समाजभावना अत्यंत आरोग्यदायी असते. परंतु आज ही पध्दत ग्रामीण जीवनातून निघून गेली आहे. वैश्वीकिकरणाने ग्रामीण जीवनाचे नागरीकरण होत आहे.
आपली संस्कृती बदलत आहे. प्रत्येकाच्या अंगी वेगळा 'शिष्टपणा' येत आहे. प्रत्येकजण एकाअंगी व स्वहितदक्षक

बनला आहे. बदल तर होतच राहणार ते अपरीहार्य आहेत परंतु नवीन बदल स्वीकारतांना त्यात माणसाच्या जगण्याचा काय विचार झाला?

आजही शेतकरी हलबल आहे. इर्जिक नसल्याने तो एकटा पडला आहे. कर्ज काढतो, जमिनीचा तुकडा विकतो, बैल विकतो व हात रिकामा झाला की नैराश्याने आत्महत्या करतो. बातमी बनतो T.V. कॅमेराच्या कल्लोळात पंत प्रधान - मुख्यमंत्र्यांची प्याकजची घोषणा होते. हातात पैसे मात्र की खर्चून जातात. हिसकावून नेणारेही बरेच असतात. शेवटी झिरपत - झिरपत त्याचे हात कोरडेच राहतात.

ग्रामीण, दलित, आदिवासी यांच्या जगण्याचे सुत्र आहे. समुहभावना राजकारणांनी ह्या समुहास तोडण्याचा प्रयत्न केला.

वैश्वीककरण वा विज्ञानाच्या विकसा त्यात पडला, बदल्याच्या प्रवाहात छोटी माणसे वाहवकुन गेलीत. जागतिकीकरणाच्या अनेक जून्या गोष्टी आढळल्या.